## प्रकरण सहावे -

## उपसंहार

## - निसर्गकवी यादृष्टीने उक्त कवींची तुलना

## - उपसंहार -

मराठीतील बालकवी अणि हिंदीतील सुमित्रानंदन पंत हे दोघे निसर्गकवी. मराठी जगतातील सर्व समीक्षक जसे बालकवींनाच निसर्गकवी मानतात, त्याप्रमाणे हिंदी जगतातील सर्व समीक्षक सुमित्रानंदन पंतांना "प्रकृति कवि " म्हणजेच निसर्गकवी मानतात. हे दोघेही सौंदर्यवादी कवी आहेत. सौंदर्यदर्शनाने दोघेही मुग्ध होतात आणि दोघांच्याठिकाणी सौंदर्याचे मोठे आकर्षण आहे. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघांच्या समान विषयांवर कविता आहेत [ परिशिष्ट क्रमांक १]. दोघांच्याही काही कल्पना परस्परांशी मिळत्याजुळत्या आहेत [परिशिष्ट क्रमांक २]. या साम्यामुळेच दोघांमध्ये तौलनिक विचाराच्यादृष्टीने पुष्कळच सामुग्री मिळते. काव्यप्रेरणा, काव्यवृत्ती, सौंदर्याविष्कार आणि निसर्गरूपे या बाबतींत दोघांत तुलना करता येते. तशी तुलना या लघुप्रबंधात केली गेली असून दोघांतील साम्यवैषम्याचा शोध घेतला आहे. अर्थात ही तुलना करताना प्रामुख्याने त्यांच्या निसर्गकवितांचाच विचार केलेला आहे.

निसर्गदर्शन हा सर्वांच्याच आवडीचा विषय होय. फुलत्या निसर्गाच्या सहवासात गेल्यानंतर त्याच्या रम्य दर्शनाने प्राय: सर्वांनाच आनंद होतो, लहानापासून थोरापर्यंत आणि आसक्तापासून विरक्तापर्यंत सर्वांत ही निसर्गप्रीती आढळून येते. पहिल्या प्रकरणात या निसर्गप्रीतीचा सविस्तर विचार करून निसर्गप्रीतीच्या कारणांची मीमांसा केलेली आहे. निसर्गप्रीतीचा विचार तात्त्विक, वैज्ञानिक आणि कलात्मक दृष्टीने करता येतो. कविकृत निसर्गचित्रणात आढळणारी प्रीती काय, किंवा सामान्य माणसात आढळणारे निसर्ग प्रेम काय, त्याचे कारण निसर्ग सुंदर आहे हेच आहे. निसर्ग सुंदर असल्यामुळेच त्याचा सहवास हवाहवासा वाटतो. आपल्याला हवाहवासा वाटणारा हा निसर्गाचा सहवास सुलभ्यही असतो, कारण मनुष्यसृष्टी सोडल्यानंतर आपल्या अवतीभवती सारा निसर्गच पसरलेला आहे. पक्ष्यांचे जग किंवा आकाशगत सौंदर्याचा शोध घेण्यासाठी फारसे कुठे बाहेर जावे लागत नाही. आपणांस पहाव्या अशा वाटणाऱ्या या वस्तू सुंदरच असतात.

त्यामुळे आपली सौंदर्यभावना हीच आपल्या निसर्गप्रीतीचे खरे कारण असते. या कारणानेच निसर्गाच्या सहवासाची आपणांत इच्छा जागृत होते. निसर्गप्रीतीची कारणमीमांसा करताना सांगितली गेलेली साहचर्यवाद आणि सौंदर्यवाद ही दोन्ही कारणे अशी परस्पर पूरक आहेत. या गोष्टींची चर्चा पहिल्या प्रकरणात केलेली आहे.

काव्यनिर्मितीच्या पाठीमागे अनेक प्रेरणा असल्याचे सांगितले गेले आहे. त्यादृष्टीने बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या निसर्ग-कवितेमागच्या प्रेरणा कोणत्या त्याचा विचार दुस-या प्रकरणात केला गेला आहे. निसर्गप्रीती ही दोघांच्याही काव्यामागील बलवत्तर अशी प्रेरणा होय. या दोन्ही कवींत अगदी बालपणात निसर्ग सहवासाची विलक्षण आवड आढळते. या दोघांनीही निसर्गातील सौंदर्यामुळेच आपण निसर्गाकडे ओढले गेलो अशी कबुली दिलेली आहे. हे दोन्ही कवी निसर्गाच्या सौंदर्यात तल्लीन होताना दिसतात. निसर्गसौंदर्य हेच त्यांच्या काव्याचे मूलभूत अधिष्ठान आहे. कुणाही समीक्षकाचे यासंबंधी दुमत नाही. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत विशिष्ट साहित्य संप्रदायाशी जरुर निगडित आहेत. बालकवींना केशवसुत संप्रदायातील कवी मानले जाते आणि सुमित्रानंदन पंतांना छायावादाचे आधारस्तंभ समजले जाते. या कवींचा असा साहित्यिक संप्रदायाशी संबंध असला तरी, त्यांच्यावरील त्याच्या प्रभावाचा विचार केला पाहिजे. निसर्गचित्रणाच्या बाबतीत बालकवींच्यावर असलेला केशवसुतांचा प्रभाव अगदीच क्षीण असा आहे. सुमित्रानंदन पंतांच्यावर मात्र छायावादाचा मोठाच प्रभाव आढळतो, पण निसर्गचित्रणाच्या दृष्टीने विचार करता हा प्रभाव पूरकच ठरला आहे. कारण निसर्गचित्रण ही छायावादाची एक प्रबळ वृत्ती आहे. सुमित्रानंदन पंतांच्या निसर्गचित्रणाला छायावाद त्यामुळे उपकारक -च ठरलेला आहे

सामाजिक प्रेरणा ही काव्यनिर्मिती-मागील एक प्रबळ प्रेरणा होय, पण बालकवींची कविता या प्रेरणेपासून प्राय: अलिप्त अशी दिसते.

निसर्गसौंदर्याच्या साक्षात्काराचाच केवळ ध्यास बालकवींना लागलेला होता. निसर्गाच्या सौंदर्याचा जितका साक्षात्कार करुन घेता येईल तितका घ्यावा आणि निसर्गात ओतप्रोत भरलेल्या आनंदाची अधिकाधिक प्राप्ती करून घ्यावी हेच बालकवींनी मानवी कर्तव्य मानलेले दिसते. सुमित्रानंदन पंतांनी निसर्गातील आनंदाची प्राप्ती एवढेच मानवाचे कर्तव्य मानलेले नाही. निसर्ग सौंदर्याबरोबरच मनुष्य सौंदर्याकडे, विशेषत: नारी सौंदर्याकडे त्यांचे लक्ष जाते आणि मग मनुष्य आणि निसर्ग यांच्या तुलनेला त्यांच्या काव्यात भरपूर वाव सापडतो. बालकवींचा धर्म, नीति, ज्ञान या गोष्टींवर मुळीच विश्वास नव्हता. याबाबतीत त्यांच्या मनी-मानसी अनेक संभ्रम होते. याचा परिणाम असा झाला की, त्यांच्या कवितेत तत्त्वजिज्ञासेला अवसरच राहिला नाही. याउलट सुमित्रनंदन पंतांचा अव्यक्त शक्तीवर मोठा विश्वास. त्यामुळे निसर्गाच्या माध्यमातून तत्त्वजिज्ञासा करणे त्यांना शक्य झाले आहे. सारे जगत् एक चिद्विलास आहे अशी काहीशी त्यांची समजूत त्यांच्या निसर्गकवितेत व्यक्त झाली आहे. तसे पाहिले तर बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघेही बहुश्रुत, तथापि ही बहुश्रुतता बालकवींच्यावर फारसा प्रभाव पाडू शकली नाही. सुमित्रानंदन पंतांच्या बाबतीत मात्र या बहुश्रुततेचा थोडा फार परिणाम झालेला दिसतो. संस्कृत काव्याचा, विशेषत: कालिदासाचा आणि पाश्चात्य कवींचा, विशेषत: शेलीचा त्यांच्या काव्यावर असलेला प्रभाव दाखवून देता येईल. थोडक्यात, बाह्यप्रभावांच्या बाबतीत बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांत फरक आढळतो. बालकवींच्या कवितेमागे निसर्गप्रीती हीच एकमेव प्रेरणा दिसते. अन्य प्रेरणांचा त्यांच्यावर अधिक प्रभाव पडू शकलेला नाही, याचे कारण कदाचित बालकवींना लाभलेले अल्पायुष्य हे असावे. बालकवींना अवघे २८ वर्षांचे आयुष्य लाभले, तर सुमित्रानंदन पंतांना ७७ वर्षांचे आयुर्मान प्राप्त झाले. बालकवींनी थोड्याच कविता लिहिल्या, तर सुमित्रानंदन पंतांचे २० हून अधिक काव्यसंग्रह बाहेर पडले. याचे कारणही त्यांना लाभलेल्या आयुष्याचीही मर्यादाच आहे. पंतांच्या काव्यामागे अधिक प्रेरणा आढळतात. याचेही कारण त्यांना लाभलेले दीर्घायुष्य हेच कारण असावे.

तिस-या प्रकरणामध्ये बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांच्या कविव्यक्तित्त्वाचा विचार करण्यात आलेला आहे. काव्य हा वस्तु-व्यक्ति-संबंध असतो आणि त्यामुळेच निसर्गचित्रणाचा विचार करताना कविव्यक्तित्त्वाचा विचार अपरिहार्य बनतो. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांत काही समानवृत्ती आढळतात. दोघांमध्ये बालसुलभवृत्ती दिसते. बालसुलभवृत्तीने लिहिलेल्या दोघांच्या कवितांत विलक्षण साम्य आढळते. तथापि बालकवींमध्ये अखेरपर्यंत जशी एकरूप बालसुलभवृत्ती आढळते, तशी सुमित्रानंदन पंतांमध्ये आढळत नाही. त्यांच्या प्रारंभीच्या कविता बालसुलभवृत्तीतून लिहिल्या गेल्या असल्या, तरी त्यांच्या वाढत्या वयातील कवितांत किशोरावस्था, युवावस्था आणि प्रौढावस्था असा क्रमिक विकास दिसून येतो. बालसुलभवृत्तीमुळेच बालकवी स्वप्नाळूपणात रमतात आणि प-यांची व अप्सरांची गाणी गातात, एखाद्या बालकाप्रमाणे ते कल्पनेच्या जगात रममाण होतात. सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत काही ठिकाणी असे स्वप्नमय जगत व्यक्त झालेले असले तरी वास्तव जगाचे त्यांना विस्मरण होऊ शकत नाही. निसर्गाइतकेच वास्तव जगतही सुंदर आहे असा विचार त्यांनी अनेक ठिकाणी व्यक्त केला आहे. यामुळेच सुमित्रानंदन स्वप्नाळूपणात अधिक [redacted] रमत नाहीत.

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघांतही निसर्गाच्या मानवी--करणाची फार मोठी प्रवृत्ती आढळते. मानवीकरणाची असंख्य उदाहरणे दोघांच्याही कवितांत आढळून येतात. तथापि या दोघांच्या मानवीकरणा--तही थोडा फार फरक आढळतो. बालकवींच्या मानवीकरणात विवाहादी -सारख्या मानवीघटनांचा आरोप असतो. तसा आरोप पंतांच्या कवितांत क्वचित आढळून येतो. तसेच मांसल नारीरूपाचा निसर्गावर केलेला आरोप बालकवींच्या कवितेत आढळत नाही. सुमित्रानंदन पंतांच्या मानवीकरणात मात्र स्त्री-रूपाची अनेक मांसल, ऐन्द्रिय चित्रे आढळतात.

बालकवींना सौंदर्य आढळते ते केवळ निसर्गातच. निसर्गातील वस्तूंतच त्यांना सौंदर्याचा साक्षात्कार होतो. सुमित्रानंदन पंतांची सौंदर्यलोलुपवृत्ती फक्त निसर्ग सौंदर्यापुरतीच राहात नाही. निसर्गसौंदर्याप्रमाणेच त्यांना स्त्रीसौंदर्य आणि मनुष्यसौंदर्यही लुब्ध करते. सुमित्रानंदन पंतांच्या सौंदर्य--बोधामध्ये अशी एक व्यापकता आढळते.

बालकवींच्या काव्यात मनुष्य जगताच्या संदर्भात घोर निराशेचा स्वर आढळतो. मानवजगत हे संकुचित आणि स्वार्थी आहे, अशी त्यांची ठाम समजूत होती. त्यांना मनुष्यजगताचा आलेला तो अनुभव असावा. त्यांना सुख, समाधान, शांती, दिव्य असे जे काही चांगले आढळते ते फक्त निसर्गातच. निसर्गाच्या सापेक्षतेने आपल्या जीवनाचा ते जेंव्हा विचार करतात. तेंव्हा त्यांना तेथे जडता आणि दुःखच आढळून येते. आणि म्हणूनच जगताच्या संबंधाने त्यांच्या कवितेत एक निराशावादी वृत्ती दिसते. सुमित्रा--नंदन पंतांची अनुभूती काही वेगळी असल्यामुळे जगताच्या संबंधाने त्यांच्या कवितेत मोठा आशावाद आढळतो. कदाचित आस्तिक्यबुध्दीमुळे त्यांच्या कवितेला आशावादाचे हे वरदान लाभलेले असावे. निसर्गाप्रमाणेच सुमित्रानंदन पंतांना जग आणि जीवित दोन्हीही सुंदर वाटतात.

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांची कविता प्रामुख्याने सौंदर्याविष्कारक आहे. त्यांच्या सौदर्याविष्काराच्या विविध अंगांचा विचार चौथ्या प्रकरणात केलेला आहे. दोघांची काव्यनिर्मिती विशिष्ट भौगोलिक प्रदेशात झाली असली तरी प्रादेशिकतेची छाप त्यांच्या काव्यात फारच थोडी उमटलेली आहे. बालकवींच्या काव्यात पर्वतप्रदेशाची चित्रे नाहीत. पंतांच्या कवितेत मात्र पर्वतप्रदेश आधिक्याने येतो. तथापि दोघांच्या काव्यात उषा, संध्या, ज्योत्स्ना, रजनी, विहग, निर्झर, भ्रमर, तारका, फुले, फुलपाखरे इत्यादी गोष्टीच बहुतांशी आलेल्या दिसतात. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघांच्या कवितेत संवेदनांची मोठी समृध्दी

दिसते. दोघांनीही रंग आणि नादाच्या असंख्य संवेदना टिपलेल्या आहेत. त्यातही बालकवींचा ओढा रंगसंवेदनेकडे अधिक तर पंतांचा कल नादसंवेदनेकडे झुकलेला दिसतो. तेजापासून काळोखापर्यंत सर्व रंगांची अभिव्यक्ती या दोन्ही कवींच्या कवितांत दिसते. नाद संवेदनाही तितक्याच समर्थपणे त्यांच्या काव्यात अभिव्यक्त झाल्या आहेत. पण गंध, रस आणि स्पर्श या संवेदना रंग आणि नाद यांच्या संवेदनांच्या सापेक्षतेने फारच कमी आढळून येतात.

कविता हा वस्तु-व्यक्तिसंबंध असतो. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक रमणीय विशेष त्यांच्या कवितेत व्यक्त झाले आहेत. त्यांच्या हृदयातील भावसौंदर्य त्यांच्या कवितेच्या आधारे सहज जोखता येण्याजोगे आहे, तथापि दोघांच्या भावाभिव्यक्तीमध्ये थोडे -फार अंतर आहे. बालकवींच्या भावनाप्राधान्याने निसर्गसौंदर्याशी निगडित आहेत तर सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत निसर्गसौंदर्याबरोबरच नारीसौंदर्य आणि मानवसौंदर्याचेही विशद चित्रण येते. त्यामुळे त्यांच्या कवितेत बालकवींच्यापेक्षा भावविविधता अधिक आढळते.

बालकवी आणि पंत दोघांच्याही कवितेत उत्तुंग कल्पनाशालित्व आहे. बालकवींची कविता प्राय: कल्पनाचित्रातच अधिक रमते. सृष्टीच्या वास्तवरूपापेक्षा कल्पनाजगताचे वेड त्यांच्याठिकाणी अधिक दिसते. याउलट पंतांच्या कवितेत वस्तू आणि व्यक्ती यांचा समतोल आढळतो. त्यांची कल्पनाशक्ती वास्तवाधारेच कल्पनानिर्मिती करते आणि सौंदर्याविष्कार साधते. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघेही सौंदर्यस्त्रष्टे आहेत. सुभग शब्द -योजना, सुसंगत वृत्तयोजना, लय आणि ताल यांचा मेळ व नितळ घाट हे अभिव्यक्ति-सौंदर्याचे विशेष दोघांच्याही कवितेत आढळतात.

सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत बालकवींच्या कवितेपेक्षा निसर्ग--चित्रणाची अधिक रूपे व्यक्त झालेली आहेत. बालकवींच्या कवितेत ख-या अर्थाने आलम्बनरूप, मानवीकरणरूप, आणि अलंकरणरूप हीच निसर्गरूपे आढळतात. याउलट सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत निसर्गचित्रणाची प्राय: सर्व रूपे आढळून येतात. बालकवींच्या निसर्गचित्रणात आलम्बनरूप निसर्गचित्रणही फारच थोडया कवितेत दिसते. बालकवी स्वप्नसृष्टीतच अधिक तल्लीन होत असल्यामुळे असे घडते. त्यामानाने सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत आलम्बनरूप निसर्गचित्रण अधिक येते. मानवीकरण निसर्गचित्रणाची प्रवृत्ती दोघांतही प्रकर्षाने आढळते.

अलंकरणरूप निसर्ग-चित्रणाच्या बाबतीत बालकवी आणि पंत दोघांनीही निसर्गातील विविध उपमाने योजिलेली आढळतात. रूपकाची योजना दोघांतही आढळते, पण बालकवींचा अधिक भर उत्प्रेक्षेवर दिसतो, तर सुमित्रानंदन पंतांना उपमा अधिक प्रिय असलेली दिसते. बालकवींनी उद्दीपन-रूप निसर्गचित्रणाचा कुठेही प्रयत्न केलेला नाही. याउलट पंतांच्या कवितेत प्रेमभावनेचा आविष्कार होत असल्यामुळे स्वाभाविकरीत्याच उद्दीपनरूप निसर्गचित्रणाची अनेक उदाहरणे त्यांच्या कवितेत आढळतात. त्याचप्रमाणे बालकवींच्या मनात अध्यात्म, ज्ञान या गोष्टींविषयी संभ्रम असल्यामुळे त्यांनी उपदेशरूप किंवा तत्त्वजिज्ञासारूप निसर्गचित्रण केलेले नाही. याउलट अव्यक्त शक्तीवर विश्वास असल्यामुळे पंतांच्या कवितेत तत्त्वप्रतिपादनरूप निसर्गचित्रणाची उदाहरणे जागोजाग आढळतात. पंत वर्ड्स्वर्थप्रमाणे निसर्गाला गुरु मानतात आणि त्यामुळे उपदेशरूप निसर्गचित्रणाची अनेक उदाहरणे त्यांच्या कवितेत आलेली आहेत.

पृष्ठभूमिरूप निसर्गचित्रण दोघांच्याही कवितेत अभावानेच येते. बालकवींच्या कवितेत निसर्गसौंदर्याचा मनावर होणारा परिणाम दिसून येतो. सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत हा परिणाम तर व्यक्त झालाच आहे, शिवाय

मानवजगताचा निसर्गावर होणारा परिणामही सांगितलेला आहे. मानवजगताच्या निसर्गावर होणा-या अशा परिणामाचे वर्णन बालकवींच्या कवितेत कुठेही येत नाही.

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांनी निसर्गातील केवळ सुंदर दृश्यांचेच चित्रण केलेले आहे. पण निसर्ग जसा रम्य आणि सुंदर आहे, तसाच तो भीषण आणि रौद्र आहे. या दोन्ही कवींच्या कवितेत भीषण आणि रौद्र रूपाची चित्रे अभावानेच येतात. या दोघांनी निसर्गा--तील सुंदरतेचेच प्राय: वर्णन केले आहे. निसर्गाच्या केवळ सुंदर रूपांच्या चित्रणाबद्दल काही समीक्षकांनी या दोघांनाही दूषण दिले आहे, पण सुंदराच्या चित्रणाबद्दल कोणाही कवीला असा बोल लावणे योग्य होणार नाही. सुंदराकडे माणसाचा स्वाभाविकपणेच ओढा असतो. माणसाच्या सौंदर्य--भावनेचे समाराधन होते, म्हणूनच माणसाला निसर्गाचा सहवास हवाहवासा वाटतो. निसर्गरस मानणा-या साहित्यशास्त्रज्ञांनी निसर्गरसाचा स्थायिभाव सौंदर्यभावना हाच सांगितला आहे. या सा-या गोष्टी लक्षात घेतल्या तर बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या कवितेत आढळणा-या केवळ सुंदरतेच्या वर्णनाबद्दल त्यांना दोष देणे चुकीचे होईल.

निसर्गचित्रण हा वस्तु-व्यक्ति-संबंध असतो. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या कवितांचा साकल्याने विचार केला तर, बालकवींच्यात वस्तुरूपापेक्षा कविगत कल्पनेतून निर्माण झालेल्या जगताची निर्मिती आधिक्याने आढळते. बालकवींना या कल्पनासृष्टीचा मोह अधिक वाटतो. या उलट सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत वस्तुरूप आणि व्यक्तिरूप यांचा समतोल दिसतो. आपल्या भावनांचा, कल्पनांचा वस्तुरूपावर साज चढवितांना पंतांच्या कवितेत वस्तुरूपाची गळचेपी झालेली दिसत नाही. त्यामुळेच त्यांच्या कवितेत यथातथ्य निसर्गचित्रणाची अधिक उदाहरणे आढळतात. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या कवितेत अंतर पडण्याचे हे मूलभूत कारण आहे.

—×—×—×—